Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शुक्रवार, दि. २६ जून २०२६ । वर्ष १ ।अंक ७९ ।पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

द्वारका नगर येथील जिल्हा परिषद शाळेला तळ्याचे स्वरूप!



(पान २ वर)

Selected

### बालभारती सहावीच्या पुस्तकात बदल

**पुणे:** विद्यार्थ्यांना भूतकाळ समजावून सांगत वर्तमानाचा विचार करण्याची क्षमता विकसित करायची आणि लोकशाही मूल्ये, संविधानाचा आदर, सामाजिक बांधिलकी व जबाबदार नागरिकत्वाची जाणीव निर्माण करायची. यातूनच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा पाया मजबूत करायचा, या उद्देशानेच सहावीच्या इतिहास आणि नागरिकशास्त्र विषयाच्या पुस्तकाची निर्मिती बालभारतीने केल्याचे स्पष्ट झाले आहे.महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ अर्थात बालभारतीच्या माध्यमातून यंदा हीरक महोत्सवी वर्षानिमित्त दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांना नवीन पुस्तकांची भेट देण्यात आली आहे. सहावीच्या इतिहास व नागरिकशास्त्र या पुस्तकात इतिहासाच्या १० आणि नागरिकशास्त्राच्या सहा अशा एकूण १६ प्रकरणांचा समावेश केला आहे.'इतिहासाची साधने' या प्रकरणाने या पुस्तकाची सुरुवात झाली आहे.

### बीड ते मुंबई पायी लाँग मार्चचा अंतिम टप्पा; आंदोलक ठाम, आज सायंकाळी चैत्यभूमीवर होणार सांगता

# आरक्षण उपवर्गीकरणविरोधी लाँग मार्च रोखण्याचा प्रयत्न!

## पोलिसांशी शाब्दिक वाद, कार्यकर्त्यांना मानखुर्द येथे ताब्यात, रात्रीच केली मुक्तता

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई : अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाविरोधात बीड ते मुंबई काढण्यात आलेल्या पायी लाँग मार्चच्या अंतिम टप्प्यात काही ठिकाणी आंदोलनकर्ते आणि पोलिसांमध्ये तणाव निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. मानखुर्द येथे पोलिसांनी अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्याने काही काळ वातावरण तणावपूर्ण झाले. मात्र आंदोलकांनी आपली भूमिका कायम ठेवल्यानंतर रात्री सुमारे ९ वाजता त्यांची मुक्तता करण्यात आली.**



अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याची प्रक्रिया तात्काळ थांबवावी, या प्रमुख मागणीसाठी बीड येथून मुंबईकडे हा पायी लाँग मार्च काढण्यात आला आहे. राज्यभरातील आंबेडकरी अनुयायी, युवक आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा या आंदोलनात मोठ्या प्रमाणावर सहभाग आहे. आंदोलकांचा आरोप आहे की, हा लाँग मार्च चैत्यभूमीपर्यंत पोहोचू नये, या उद्देशाने पोलिस प्रशासनाने मानखुर्द येथे कार्यकर्त्यांना ताब्यात घेऊन आंदोलन पांगविण्याचा प्रयत्न केला. काही ठिकाणी पोलिस आणि आंदोलकांमध्ये शाब्दिक वाद झाल्यानंतर कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले.

मात्र आंदोलक आपल्या मागण्यांवर ठाम राहिल्याने अखेर रात्री त्यांची मुक्तता करण्यात आली. या कारवाईदरम्यान मोर्चाचे नेतृत्व करणारे अशोक कांबळे यांच्यासह विश्वजीत करंजीकर, मनोज गायकवाड, अविनाश तमींदर, प्रदीप अडांगळे तसेच क्रांती महिला संघटनेच्या क्रांतीताई यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले होते. रात्री ९ वाजता त्यांची सुटका करण्यात आली. मुक्ततेनंतर अशोक कांबळे यांनी कार्यकर्त्यांना पुन्हा एकत्र येण्याचे आवाहन केले. "आंदोलनाचा आवाज दडपण्याचा प्रयत्न झाला, मात्र आम्ही मागे हटणार नाही. सर्व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने चैत्यभूमीवर उपस्थित राहावे," असे त्यांनी सांगितले.या लाँग मार्चची सांगता आज (२६ जून) सायंकाळी ५ वाजता मुंबईतील चैत्यभूमी येथे होणार असून, मोठ्या संख्येने आंबेडकरी अनुयायी उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईत सुरक्षा व्यवस्थाही वाढविण्यात आली आहे.

### सरकार या मागण्यांवर काय भूमिका घेणार...

दरम्यान, आंदोलनकर्त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारकडे अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ थांबविण्याची मागणी केली आहे. तसेच न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल सार्वजनिक करावा आणि जातीनिहाय जनगणना पूर्ण झाल्याशिवाय आरक्षणासंदर्भात कोणताही निर्णय घेऊ नये, अशीही त्यांची भूमिका आहे. या आंदोलनामुळे राज्यात आरक्षण, सामाजिक न्याय आणि संविधानिक हक्कांबाबत पुन्हा एकदा व्यापक चर्चा सुरू झाली असून, सरकार या मागण्यांवर काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# केतन हत्या प्रकरणात राज्य सरकारची एन्ट्री


## विशेष तपास पथकाची स्थापना

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** पुणे जिल्ह्यातील लोहगड किल्ल्यावर घडलेल्या केतन अग्रवाल हत्या प्रकरणात राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. या प्रकरणाचा तपास आता विशेष तपास पथक (एसआयटी) मार्फत करण्यात येणार असल्याची घोषणा विधानसभेत करण्यात आली. त्यामुळे राज्यभर चर्चेत असलेल्या या प्रकरणाच्या तपासाला आता नवे वळण मिळाले आहे.

विधानसभेत आमदार सुनील शेळके यांनी या प्रकरणात सखोल आणि निष्पक्ष चौकशीची मागणी केली होती. त्यानंतर विधानसभा अध्यक्ष राजू खरे यांनी या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटी स्थापन करण्याची घोषणा केली. या निर्णयामुळे तपास अधिक व्यापक पद्धतीने होणार असून, प्रकरणातील सर्व पैलूंची सखोल चौकशी केली जाणार आहे.

हे प्रकरण सुरुवातीला अपघाती मृत्यूचे मानले जात होते. १८ जून रोजी केतन अग्रवाल यांचा लोहगड किल्ल्यावर ट्रेकिंगदरम्यान डोंगरावरून पडून मृत्यू झाल्याची माहिती समोर आली होती. मात्र कुटुंबीयांनी व्यक्त केलेल्या संशयानंतर पोलिसांनी तपासाची



दिशा बदलली आणि धक्कादायक माहिती उघड झाली. पोलिस तपासात केतनची होणारी पत्नी सिया गोयल आणि तिचा कथित प्रियकर चेतन चौधरी यांनी कट रचून केतनचा खून केल्याचा आरोप समोर आला.

### एसआयटीमार्फत तपास


या प्रकरणी दोघांनाही अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना २९ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सध्या या दोघांची कसून चौकशी सुरू आहे. सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल कॉल डिटेल्स आणि इतर तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी तपास पुढे नेला आहे. एसआयटीच्या स्थापनेनंतर या सर्व पुराव्यांचा नव्याने अभ्यास करून प्रकरणातील प्रत्येक बाब तपासली जाणार असल्याचे मानले जात आहे.

# नशिराबादच्या भव्य प्रवेशद्वाराची 'एक बाजू' पुन्हा अंधारात; प्रशासनाचे दुर्लक्ष

## काही दिवसांपूर्वी एका बाजूची लाईट दुरुस्त; नागरिकांकडून कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी:** नशिराबाद शहराची ओळख मानल्या जाणाऱ्या मुख्य भव्य प्रवेशद्वाराच्या रोषणाईचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. लाखो रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या या प्रवेशद्वाराची एक बाजू सध्या पूर्णपणे अंधारात गेल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाचे दुर्लक्ष की वारंवार होणारा तांत्रिक बिघाड, असा सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत. काही दिवसांपूर्वी प्रवेशद्वाराच्या एका बाजूची विद्युत रोषणाई बंद पडल्याची बाब समोर आली होती. त्यानंतर प्रशासनाने दखल घेत संबंधित भागाची दुरुस्ती केली. मात्र आता प्रवेशद्वाराच्या वरच्या पाटीची दुसरी बाजू बंद पडल्याने पुन्हा एकदा रोषणाईचा प्रश्न निर्माण झाला आहे. एका बाजूची लाईट सुरू होताच दुसरी बाजू अंधारात जाण्याचा प्रकार



नागरिकांच्या चर्चेचा विषय ठरला आहे. शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी उभारण्यात आलेले हे प्रवेशद्वार रात्रीच्या वेळी आकर्षक रोषणाईमुळे विशेष लक्ष वेधून घेत असते. मात्र वारंवार विद्युत यंत्रणेत बिघाड होत असल्याने प्रवेशद्वाराच्या सौंदर्यावर परिणाम होत आहे. यामुळे बाहेरून शहरात येणाऱ्या प्रवाशांसमोरही शहराची नकारात्मक प्रतिमा निर्माण होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. स्थानिकांच्या मते, केवळ एखादी लाईट बदलणे किंवा तात्पुरती दुरुस्ती करणे हा या समस्येवर कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. वारंवार उद्भवणाऱ्या बिघाडामागील नेमके कारण शोधून संपूर्ण विद्युत यंत्रणा, वायरिंग आणि नियंत्रण प्रणालीची सखोल तपासणी करणे आवश्यक आहे"एका बाजूची लाईट सुरू झाली की दुसरी बंद पडते, हा प्रकार नेमका कशामुळे घडतो आहे?" असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शहराच्या प्रवेशद्वारासारख्या महत्त्वाच्या वास्तूची देखभाल अधिक प्रभावीपणे करण्याची गरज असल्याचे मतही व्यक्त होत आहे.दरम्यान, नशिराबाद नगर प्रशासनाने तातडीने दखल घेऊन बंद पडलेली लाईट सुरू करावी तसेच भविष्यात अशा प्रकारच्या समस्या उद्भवू नयेत यासाठी कायमस्वरूपी तांत्रिक उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

# पत्रकारांना शिवीगाळ प्रकरणी खासदार संजय दिना पाटलांची जाहीर दिलगिरी

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** पत्रकारांशी अर्वाच्य भाषेत बोलल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर वादाच्या भोवऱ्यात सापडलेले खासदार संजय दिना पाटील यांनी अखेर जाहीर दिलगिरी व्यक्त केली आहे. पत्रकारांशी झालेल्या वादादरम्यान माझ्याकडून चुकीने काही अपशब्द निघाले. त्याबद्दल सर्व पत्रकार बांधवांची आणि पत्रकार संघटनेची मी मनापासून माफी मागतो, असे त्यांनी व्हिडीओद्वारे स्पष्ट केले. काही दिवसांपूर्वी राजकीय घडामोडींनंतर पत्रकारांनी त्यांच्या



भूमिकेबाबत प्रश्न विचारण्यासाठी संपर्क साधला होता. त्यावेळी झालेल्या शाब्दिक वादात त्यांनी पत्रकारांशी आक्रमक भाषेत संवाद साधल्याचा व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. या घटनेनंतर पत्रकार संघटना, राजकीय नेते आणि विविध स्तरांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. वाद वाढताच संजय दिना पाटील यांनी समाजमाध्यमांवर व्हिडीओ प्रसिद्ध करून आपली भूमिका स्पष्ट केली. "माझ्या कुटुंबाबाबत अपशब्द वापरणाऱ्यांना दूर ठेवण्याची विनंती मी पत्रकारांना केली होती. मात्र त्याच विषयावर पुन्हा प्रश्न विचारले गेल्याने वाद निर्माण झाला. त्या क्षणी माझ्याकडून काही अपशब्द निघाले. त्याबद्दल मी पत्रकार बांधवांची मनापासून दिलगिरी व्यक्त करतो," असे त्यांनी म्हटले. या घटनेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया दिली. संपूर्ण घटनेची माहिती घेऊनच भाष्य करेन, मात्र कोणत्याही लोकप्रतिनिधीने पत्रकारांना धमकी देणे अथवा अशा प्रकारची भाषा वापरणे योग्य नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच संजय दिना पाटील यांनी पत्रकारांचा अपमान करण्याचा हेतू नसल्याचे आपल्याशी बोलताना सांगितल्याची माहितीही त्यांनी दिली. दरम्यान, या प्रकरणामुळे लोकप्रतिनिधी आणि प्रसारमाध्यमांमधील संवादाची मर्यादा, पत्रकारांच्या सन्मानाचा प्रश्न आणि सार्वजनिक जीवनातील जबाबदारी यावर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. राजकीय मतभेद असले तरी लोकशाहीत प्रसारमाध्यमांचा सन्मान राखणे ही प्रत्येक लोकप्रतिनिधीची जबाबदारी असल्याची भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

# महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढणार: पंजाबराव डख

## जुलै पहिल्या आठवड्यात अतिवृष्टीचा इशारा



जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** महाराष्ट्रात मान्सून आता पूर्णपणे सक्रिय झाला असून पुढील काही दिवस राज्यातील बहुतांश भागांत जोरदार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. भारतीय हवामान विभागाने (IMD) २६ ते ३० जून या कालावधीत राज्यात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला असतानाच हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनीही जुलैच्या पहिल्या आठवड्यात अनेक भागांत अतिवृष्टी होण्याचा इशारा दिला आहे. पंजाबराव डख यांच्या मते, तळकोकणात अडकून पडलेला मान्सून आता पुढे सरकला असून जवळपास संपूर्ण महाराष्ट्र मान्सूनच्या प्रभावाखाली आला आहे. त्यामुळे ज्या भागांत अद्याप समाधानकारक पाऊस झाला नव्हता, तेथेही पुढील पाच दिवसांत चांगल्या पावसाची शक्यता आहे. यामुळे खरीप हंगामातील पेरण्यांना मोठी चालना मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या अंदाजानुसार, २६ ते ३० जूनदरम्यान पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर, सोलापूर तसेच मराठवाड्यातील धाराशिव, बीड आणि लातूर जिल्ह्यांमध्ये चांगला पाऊस होण्याची शक्यता आहे. या काळात काही भागांत नद्या, नाले आणि ओढ्यांच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होऊ शकते. त्यामुळे नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी आणि प्रशासनाने सतर्क राहण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. याशिवाय, जुलैच्या पहिल्या आठवड्यात मुंबई, पुणे आणि राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी होण्याचा इशारा डख यांनी दिला आहे. काही भागांत मुसळधार पाऊस, तर काही ठिकाणी मध्यम किंवा रिमझिम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

यंदा राज्यात दुष्काळ पडण्याची शक्यता नसून परतीचाही पाऊस समाधानकारक राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मात्र, शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरणी न करता शेतात पुरेशी ओल निर्माण झाल्यानंतरच पेरणी करावी, असा सल्लाही त्यांनी दिला आहे. दरम्यान, भारतीय हवामान विभागानेही पुढील काही दिवस राज्यातील अनेक जिल्ह्यांसाठी मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे नागरिकांनी हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करावे, तर स्थानिक प्रशासनाने संभाव्य पूरस्थिती लक्षात घेऊन आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. राज्यात मान्सूनचा जोर वाढत असल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण असले, तरी अतिवृष्टीची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी सतर्क राहणे आवश्यक असल्याचे हवामान तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज



# जळगाव जिल्ह्यासाठी 14.50 कोटींची मदत मंजूर

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला असून जळगाव ल्ह्यासाठी तब्बल १४ कोटी ५० लाख ८९ हजार रुपये मदत मंजूर करण्यात आली आहे. राज्य शासनाने २५ जून २०२६ रोजी (काल) यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित केला असून जळगाव जिल्ह्यातील १४ हजार ३६० बाधित शेतकरी आणि ७ हजार ९३४ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान या मदतीत समाविष्ट करण्यात आले आहे. या निर्णयामागे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आ. चंद्रकांत पाटील, आ. प्रा. चंद्रकांत सोनवणे, आ. अमोल जावळे, आ. मंगेश चव्हाण यांच्यासह इतर आमदारांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा महत्त्वाचा ठरला.

अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची माहिती प्राप्त होताच पालकमंत्री पाटील यांनी जिल्हा प्रशासनाला तातडीने पंचनामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसेच मुख्यमंत्री आणि कृषिमंत्री यांच्याकडे वेळोवेळी बैठका व पत्रव्यवहार करून जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्याची मागणी लावून धरली होती.

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल विभाग, कृषी विभागाने शासनाकडे नुकसान अहवाल सादर केला होता. त्याला यश मिळत राज्य शासनाने राज्यातील विविध जिल्ह्यांसाठी एकूण १०६ कोटी ५६ लाख ४८ हजार रुपयांच्या मदतीस मंजुरी दिली असून जळगाव जिल्ह्यासाठी तब्बल १४ कोटी ५० लाख ८९ हजार रुपये मदत मंजुर करण्यात आली आहे.

> "अवकाळी पावसामुळे माहे एप्रिल व मे महिन्यात जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. त्यांना तातडीची मदत मिळावी यासाठी मुख्यमंत्री, कृषिमंत्री आणि संबंधित विभागांकडे जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आ. चंद्रकांत पाटील, आ. प्रा. चंद्रकांत सोनवणे, आ. अमोल जावळे, आ. मंगेश चव्हाण यांच्यासह त्या-त्या भागातील आमदारांच्या सहकार्याने सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.
>
> या संदर्भात माननीय कृषिमंत्री व माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे बैठका देखील झाल्या. शासनाने सकारात्मक निर्णय घेतल्याने खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून शेतीच्या पुढील कामांसाठीही मदत होणार आहे. मंजूर निधी थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार असून प्रशासनाने त्यासाठी आवश्यक कार्यवाही गतीने करावी.
>
> -पालकमंत्री गुलाबराव पाटील

# पणन महासंघाच्या अध्यक्षपदी खान्देशातील रोहित निकम; 70 वर्षांनंतर भाजपच्या नेतृत्वाकडे धुरा

## राहुल काकडे यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड

जन सम्राट टाईम्स

**मुंबई / जळगाव : :** महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन (पणन महासंघ) या राज्यातील सहकार क्षेत्रातील महत्त्वाच्या शिखर संस्थेच्या अध्यक्षपदी खान्देशातील युवा सहकार नेते रोहित दिलीपराव निकम यांची, तर उपाध्यक्षपदी राहुल काकडे यांची गुरुवारी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. विशेष म्हणजे, तब्बल ७० वर्षांनंतर या महत्त्वाच्या संस्थेचे नेतृत्व भारतीय जनता पक्षाशी संबंधित नेतृत्वाकडे आले असून, सहकार क्षेत्रात या निवडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मुंबई येथील पणन महासंघाच्या मुख्यालयात अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सह निबंधक, सहकारी संस्था, मुंबईचे शाहजी पाटील यांनी



कामकाज पाहिले.

यामध्ये रोहित निकम आणि राहुल काकडे यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. निवडीनंतर रोहित निकम यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पणन मंत्री जयकुमार रावल, मंत्री हसन मुश्रीफ, मंत्री गिरीश महाजन, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण तसेच मंत्री संजय सावकारे यांचे आभार मानले. यावेळी बोलताना त्यांनी, "माझ्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरवत शेतकरी हित, सहकार क्षेत्राची मजबुती, पारदर्शक व गतिमान प्रशासनासाठी पूर्ण क्षमतेने कार्य करणार आहे. 'सहकार से समृद्धी' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी पणन महासंघाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न राहील," अशी भूमिका मांडली. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन ही राज्यातील कृषी उत्पादनांचे विपणन, साठवणूक, खरेदी-विक्री तसेच शेतकरी हिताच्या विविध योजनांची अंमलबजावणी करणारी प्रमुख सहकारी शिखर संस्था आहे. त्यामुळे अध्यक्षपदाची जबाबदारी ही केवळ प्रशासकीय नसून राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या हिताशी थेट संबंधित मानली जाते. शेतकरी कुटुंबातून आलेले रोहित निकम हे सध्या जळगाव जिल्हा सहकारी दूध संघाचे संचालक असून, जळगाव जिल्हा कृषी उद्योग व सर्व सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. तसेच ते भाजप सहकार आघाडी, महाराष्ट्र राज्यचे सहसंयोजकही आहेत. सहकार, कृषी आणि ग्रामीण विकास क्षेत्रातील त्यांच्या अनुभवामुळे पणन महासंघाच्या कामकाजाला नवी गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### या मान्यवरांची होती उपस्थिती

या निवड प्रक्रियेवेळी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, माजी आमदार जयंत पाटील, संचालक संजय पवार, अतुल गण्यारपवार, सुभाष रघाटाटे, रमेश हिंगणकर, नितीन हिवसे, सुनील चव्हाण, पांडुरंग घुगे, संदीप नरके, प्रमोद रावराणे, आबासाहेब पाटील, बळवंत पाटील, धनश्रीदेवी घाटगे, अयोध्या धस, अशोक हटकर, दत्तात्रय पानसरे यांच्यासह पणन महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक राहुल कुलकर्णी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मुंबई येथील पणन महासंघाच्या मुख्यालयात अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली.

# द्वारका नगर येथील जिल्हा परिषद शाळेला तळ्याचे स्वरूप!

## विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद। प्रतिनिधी :** पावसाळा सुरू होताच पायाभूत सुविधांच्या दुरवस्थेचे चित्र अनेक ठिकाणी समोर येत आहे. त्यातच नशिराबाद येथील द्वारका नगर परिसरातील जिल्हा परिषद शाळेची अत्यंत चिंताजनक अवस्था उघड झाली आहे. पहिल्याच काही पावसांत शाळेच्या संपूर्ण पटांगणाला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसह त्यांच्या आरोग्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शाळेच्या परिसरातील मैदानात मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी साचल्याने संपूर्ण परिसर चिखलमय झाला आहे. शाळेचे मुख्य प्रवेशद्वार, पिण्याच्या पाण्याचा हातपंप तसेच विद्यार्थ्यांच्या खेळासाठी असलेली घसरगुंडी यांसारखी साधनेही पाण्याखाली गेली आहेत. परिणामी विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून साचलेल्या पाण्यातून मार्ग काढत वर्गात जावे लागत आहे.



लहान मुलांना दररोज या पाण्यातून ये-जा करावी लागत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. मुले घसरून पडण्याच्या घटना घडू शकतात, अशी भीती पालकांनी व्यक्त केली आहे. शाळेत शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना अशा परिस्थितीचा सामना करावा लागत असल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी आहे. याहून गंभीर बाब म्हणजे मैदानात साचलेल्या पाण्यामुळे डासांची मोठ्या प्रमाणावर पैदास होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया यांसारख्या साथीच्या आजारांचा धोका वाढला असून विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर संकट ओढवू शकते. शासन एकीकडे स्वच्छता आणि आरोग्यविषयक विविध मोहिमा राबवत असताना जिल्हा परिषद शाळेतील ही परिस्थिती प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शाळेच्या परिसरात पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी कोणतीही प्रभावी व्यवस्था नसल्याने दरवर्षी ही समस्या उद्भवते. मात्र याकडे संबंधित विभागाकडून कायम दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. "आमची मुले शाळेत शिकण्यासाठी येतात की आजारी पडण्यासाठी?" असा संतप्त सवाल आता पालकांकडून उपस्थित केला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# प्रवाशांनी भरलेली बस पुराच्या विळख्या अडकली!

## मुक्ताईनगर तालुक्यांना पावसाचा तडाखा

जन सम्राट टाईम्स

**मुक्ताईनगर। प्रतिनिधी :** अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर जळगाव जिल्ह्यात बुधवारी मान्सूनने दमदार हजेरी लावत रावेर आणि मुक्ताईनगर तालुक्यांना अक्षरशः झोडपून काढले. अवघ्या काही तासांच्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून नाले-ओढे दुथडी भरून वाहू लागल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी नागरिकांचे मोठे नुकसान झाले असून प्रशासनासमोरही आव्हान उभे राहिले आहे. मुक्ताईनगर तालुक्यातील कर्की गावाजवळ घडलेल्या घटनेने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी आलेली प्रवाशांनी भरलेली एक खाजगी बस अचानक आलेल्या पुराच्या पाण्यात अडकली. नाल्यावरून वेगाने पाणी वाहत असताना बस चालकाने प्रसंगावधान राखत वाहन थांबवले. त्यामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली आणि बसमधील सर्व प्रवाशांचे प्राण वाचले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत मदतकार्य सुरू केले. ग्रामस्थांच्या मदतीने बसमधील सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र अचानक आलेल्या पुरामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, रावेर तालुक्यातही पावसाने मोठा कहर केला. अनेक गावांमध्ये नाल्यांचे पाणी थेट वस्त्यांमध्ये शिरल्याने घरांसह व्यावसायिक



आस्थापनांमध्ये पाणी घुसले. त्यामुळे संसारोपयोगी साहित्य, धान्य तसेच व्यापाऱ्यांच्या मालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे समोर आले आहे.

### काही भागांतील रस्ते पाण्याखाली

या नुकसानीमुळे नागरिक हवालदिल झाले असून प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी प्रभावित नागरिकांकडून करण्यात येत आहे.पावसामुळे काही भागांतील रस्ते पाण्याखाली गेले होते. परिणामी वाहतुकीवरही मोठा परिणाम झाला. अनेक मार्गांवर वाहतूक विस्कळीत झाल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. मात्र, या पावसामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. खरीप हंगामासाठी आवश्यक असलेला पाऊस वेळेवर झाल्याने पेरणीच्या कामांना वेग येणार असल्याची अपेक्षा त्यामुळे एका बाजूला नागरिकांना पावसाचा फटका बसला असला तरी दुसरीकडे शेतीसाठी हा पाऊस वरदान ठरत असल्याचे चित्र आहे.

# एरंडोल नगरपरिषदेची कुत्र्यांवर नियंत्रणासाठी प्रभावी मोहीम!

जन सम्राट टाईम्स

**एरंडोल। प्रतिनिधी :** एरंडोल शहरातील भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या समस्येवर नियंत्रण मिळविण्यासाठी एरंडोल नगरपरिषदेने प्रभावी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. 'माझी वसुंधरा अभियान 7.0' तसेच 'स्वच्छ सर्वेक्षण 2026' अंतर्गत शहरात विशेष मोहीम राबविण्यात येत असून भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणावर भर देण्यात येत आहे. नगरपरिषदेच्या माहितीनुसार, मा. मुख्याधिकारी आणि मा. नगराध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली ABC (Animal Birth Control) कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. या अंतर्गत शहरातील आक्रमक व घातक भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांचे शास्त्रोक्त पद्धतीने निर्बीजीकरण करण्यात येत आहे.

शहरात दिवसेंदिवस भटक्या कुत्र्यांची संख्या वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत होते. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि सकाळ-संध्याकाळ फिरणाऱ्या नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेने हाती घेतलेला हा उपक्रम महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

ABC कार्यक्रमामुळे भटक्या कुत्र्यांची अनियंत्रित वाढ रोखण्यास मदत होणार असून भविष्यात या समस्येवर दीर्घकालीन नियंत्रण मिळविण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. यासोबतच नागरिकांच्या सुरक्षिततेत वाढ होण्यासही मदत होईल, असा विश्वास नगरपरिषद प्रशासनाने व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे, या मोहिमेत प्राण्यांप्रती मानवीय दृष्टिकोन जपण्यात येत आहे. कुत्र्यांना कोणतीही इजा न पोहोचवता त्यांचे निर्बीजीकरण करून पुन्हा त्यांच्या परिसरात सोडण्यात येत असल्याची माहिती नगरपरिषदेकडून देण्यात आली आहे.

# "वीज बंद असल्याचे सांगितले... पण खांबावर चढताच लागला करंट"; पहूर येथील तरुणाचे आयुष्य उद्ध्वस्त

## वीज खांबावरील दुरुस्तीच्या कामादरम्यान भीषण अपघात

जन सम्राट टाईम्स

**पहूर, ता. जामनेर (प्रतिनिधी)** जामनेर तालुक्यातील पहूर परिसरात घडलेल्या एका भीषण अपघाताने 23 वर्षीय तरुणाचे आयुष्य अक्षरशः उद्ध्वस्त झाले आहे. घरातील एकमेव कमावता सदस्य असलेल्या रोहित हरीष ढाकरे यांना वीज खांबावरील दुरुस्तीचे काम करत असताना अचानक सुरू झालेल्या वीजप्रवाहाचा जोरदार धक्का बसला. या अपघातात ते खांबावरून खाली कोसळले असून गंभीर दुखापतीमुळे त्यांना कायमस्वरूपी अपंगत्व आल्याचे सांगण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रोहित ढाकरे हे महावितरणच्या बाह्य स्त्रोतावरील कामगार म्हणून कार्यरत होते. 10 फेब्रुवारी 2026 रोजी पहूर परिसरातील 11 केव्ही वीजवाहिनीवरील दुरुस्तीचे काम सुरू होते. काम सुरू करण्यापूर्वी वीजपुरवठा बंद करण्यात आल्याचे सांगण्यात आले होते. त्यानंतर रोहित हे वीज खांबावर चढून काम करत असताना अचानक वीजप्रवाह सुरू झाला. या धक्क्यामुळे त्यांचा तोल गेला आणि ते थेट खाली कोसळले. अपघातानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी पहूर, जळगाव आणि पुढे मुंबई येथे हलविण्यात आले. डॉक्टरांच्या प्रयत्नांनंतर त्यांचा जीव वाचला असला तरी या अपघातामुळे त्यांना कायमस्वरूपी अपंगत्व आल्याचा दावा करण्यात येत आहे. परिणामी त्यांच्या कुटुंबावर आर्थिक आणि मानसिक संकट कोसळले आहे. रोहित यांच्या कुटुंबात पत्नी आणि अवघा एक वर्षाचा मुलगा आहे. घरातील सर्व आर्थिक जबाबदारी त्यांच्या खांद्यावर होती. मात्र या अपघातानंतर त्यांची काम करण्याची क्षमता बाधित झाली असून कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. उपचारासाठी झालेला मोठा खर्च, भविष्यातील वैद्यकीय गरजा आणि लहान मुलाच्या संगोपनाची चिंता यामुळे संपूर्ण कुटुंब प्रचंड तणावाखाली आहे. या प्रकरणी संबंधित वरिष्ठ तंत्रज्ञ गोविंद सुखलाल धनगर यांच्या विरोधात पहूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 125 (ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काम सुरू असताना वीजपुरवठा कसा सुरू झाला, यामागे निष्काळजीपणा होता का, याचा तपास पोलीस करत आहेत.

### न्याय, नुकसान भरपाईची मागणी

तसेच या अपघातामुळे झालेले शारीरिक, मानसिक आणि आर्थिक नुकसान लक्षात घेऊन योग्य नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. या घटनेमुळे केवळ रोहित यांचेच नव्हे तर त्यांच्या पत्नी आणि चिमुकल्या मुलाचे भवितव्यही अंधारात गेले आहे. त्यामुळे या कुटुंबाला न्याय आणि आर्थिक आधार मिळणार का, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले असून रोहित ढाकरे यांना न्याय मिळावा, अशी सर्वसामान्य नागरिकांकडून अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# विद्यार्थ्यांना पितृ प्रेमाची करून दिली जाणीव!

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी :** तालुक्यातील नेहरू विद्यामंदिर तळवेल येथे पितृदिन (फादर्स डे) उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला या विशेष कार्यक्रमात विद्यार्थ्यांना वडिलांचा त्याग कष्ट प्रेम आणि संस्काराचे महत्त्व पटवून देण्यात आले. या कार्यक्रमात एस. एस. अहिरे सर यांनी "बाप ओळखता येत नसतो" या विषयावर अत्यंत हृदयस्पर्शी विचार व्यक्त करत उपस्थित विद्यार्थ्यांना व पालकांना भावूक केले. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की आईप्रमाणेच वडिलांचेही मुलांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व असते कुटुंबाच्या सुखासाठी मुलांच्या शिक्षणासाठी आणि




त्यांच्या उज्वल भविष्यासाठी वडील आयुष्यभर संघर्ष करत असतात. वडिलांचे प्रेम अनेकदा शब्दात व्यक्त होत नाही ते त्यांच्या कृतीतून दिसून येते स्वतःच्या इच्छा आकांक्षा बाजूला ठेवून मुलांच्या आनंदासाठी रात्रंदिवस मेहनत करणारा माणूस म्हणजे बाप" असे त्यांनी सांगितले. बापाच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना त्यांनी एक सुंदर उदाहरण दिले. बाप हा नारळासारखा असतो बाहेरून कठोर वाटतो पण आतून गोड आणि प्रेमळ असतो जसे मोराला पावसाचे महत्व कळत नाही तसाच मुलांना जिवंतपणे बापाचा खरा त्याग आणि प्रेम समजत नाही असे भावनिक शब्द त्यांनी व्यक्त केले. आई रडते पण बाप आधार देतो. आई रोजच्या जेवणाची व्यवस्था करते तर बाप मुलांच्या शिक्षणासाठी आणि भविष्या करता आयुष्यभर पैशाची बचत करतो. मुलांच्या यशात आनंद मानणारा आणि अपयशात खंबीरपणे पाठीशी उभा राहणारा माणूस म्हणजे बाप. मनातील वेदना न बोलता सहन करणारा आणि मुलांची भविष्य ओळखणारा बाप हेच या जगातले खरे ज्योतिषी आहेत असे त्यांनी नमूद केले. तसेच माझ्या आई-वडिलांनी माझ्यासाठी काय केले याचा विचार करत बसण्यापेक्षा मी माझ्या आई वडिलांसाठी काय करू शकतो याचा विचार प्रत्येकाने करायला हवा असे आवाहन त्यांनी केले. घरात देवघर नसले तरी चालेल स्वतःची बेडरूम नसली तरी चालेल पण आई-वडिलांना म्हातारपणी सुखाने राहता येईल अशी एक छोटी खोली जरूर बांधा. या विचारांनी उपस्थित विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि पालक यांनाही अश्रू अनावर झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्ही.टी. रोटे सर यांनी केले कार्यक्रमासाठी आवश्यक बैठक व्यवस्था शाळेतील कर्मचारीवृंदांनी केली. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन एस. सी. पाटील सर यांनी मानले.

# पालिका शाळा स्वयंसेवी संस्थांना देऊ नका!

## शिक्षकांचा तीव्र विरोध

जन सम्राट टाईम्स

**मुंबई| प्रतिनिधी:** शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची जबाबदारी महापालिकेची असताना काही पालिका शाळांचे संचालन स्वयंसेवी संस्थांकडे सोपविण्याच्या निर्णयाला शिक्षक संघटनांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. या निर्णयामुळे महापालिकेच्या स्वतःच्या शिक्षण यंत्रणेवरील अविश्वास स्पष्ट होत असल्याची भावना शिक्षकांनी व्यक्त केली आहे. पालिकेच्या प्राथमिक शिक्षण अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने १ जून रोजी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार माहुल म्हाडा कॉलनी येथील पालिका इंग्रजी शाळेत इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या वर्गांसाठी स्वयंसेवी संस्थेमार्फत शिक्षक नियुक्त करण्यास परवानगी देण्यात आली आहे. सध्या या शाळेत इयत्ता पहिली ते पाचवीमध्ये २६१, सहावी ते आठवीमध्ये ९२, नववीमध्ये ३० आणि दहावीत २० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महापालिकेच्या निर्णयानुसार यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी काही अटी व शर्तींसह संस्थांना शाळा चालविण्याची परवानगी देण्यात आली आहे. सर्व शैक्षणिक नियोजन महापालिकेच्या पूर्वपरवानगीने करणे, शिक्षणविषयक नियमांचे पालन करणे तसेच विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची फी न घेणे या प्रमुख अटी संस्थांवर लागू करण्यात आल्या आहेत. याशिवाय राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ नुसार शैक्षणिक कामकाज करणे, टीईटी व शासनमान्य पात्रता परीक्षा उत्तीर्ण शिक्षकांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. शैक्षणिक सहलींसाठी पालकांची





पूर्वसंमती घेणे आणि कर्मचाऱ्यांकडे चारित्र्य प्रमाणपत्र असणेही आवश्यक राहणार आहे. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून शाळा चालविणे ही महापालिकेची वैधानिक जबाबदारी असल्याचे शिक्षक संघटनांचे म्हणणे आहे. सार्वजनिक निधीतून चालणाऱ्या शाळांचे संचालन बाह्य संस्थांकडे सोपविणे म्हणजे महापालिकेच्या शिक्षण व्यवस्थेवरील अविश्वास असल्याचा आरोप शिक्षकांनी केला आहे. दरम्यान, या आरोपांचे शिक्षण विभागाने खंडन केले आहे. महापालिकेच्या अनेक शाळा सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जात असून त्यांचे निकाल आणि शैक्षणिक गुणवत्ता समाधानकारक असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. महापालिकेच्या शिक्षण उपायुक्त डॉ. प्राची जांभेकर यांनी सांगितले की, "पीपीपी तत्त्वावर चालवल्या जाणाऱ्या शाळांमधील शिक्षक टीईटी उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे. तसेच विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची फी आकारली जाणार नाही."दुसरीकडे शिक्षकभारतीचे अध्यक्ष विजयकुमार पाटील यांनी पालिकेच्या शिक्षकांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण देत पटसंख्या वाढविल्याचा दावा केला. "आरटीई कायद्यानुसार शाळांची जबाबदारी महापालिकेचीच आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# ग्रा.पं. शिपायाला धमकी अन् सोशल मीडियावर आक्षेपार्ह मेसेज

## पिंपर्डे ग्रामपंचायतीतील वाद चिघळला; चौकशी व तात्काळ कारवाईची मागणी!

जन सम्राट टाईम्स

**शहादा । प्रतिनिधी:** नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील पिंपर्डे ग्रामपंचायतीत ग्रामसेविकेविरोधातील तक्रारींमुळे नवीन वाद निर्माण झाला आहे. ग्रामसेविका श्रीमती दिपाली उगलमुगले यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर आरोप करत त्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे, या मागणीसाठी बिरसा फायटर्स संघटना आक्रमक झाली असून शहादा पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. कारवाई न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे. निवेदनानुसार, संबंधित ग्रामसेविका गेल्या काही महिन्यांपासून ग्रामपंचायत कार्यालयात नियमितपणे उपस्थित राहत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामस्थांची विविध शासकीय व प्रशासकीय कामे रखडल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाल्याचे सांगण्यात आले आहे. याशिवाय ग्रामपंचायत शिपाई दिनेश वाघ यांच्यावर खोटे आरोप करून त्यांना धमकावण्यात आल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला





### यावेळी अनेक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित

यावेळी पेसा समिती अध्यक्ष गंगाराम पवार, दिनेश वाघ, श्रावण भील, ईश्वर भील, एकनाथ पावरा, शरद पवार, राहुल वाघ, प्रवीण ईशी, सागर वाघ, सागर पावरा यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.आता या प्रकरणावर शहादा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कोणती भूमिका घेतात, चौकशीचे निष्कर्ष काय येतात आणि वादावर पडदा पडतो की आंदोलन अधिक तीव्र होते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

आहे. तसेच सर्वसामान्य नागरिक आणि कर्मचाऱ्यांशी उद्धट वर्तन केल्याचाही दावा करण्यात आला आहे. या आरोपांमुळे ग्रामपंचायत परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, ग्रामसेविकेने शिपाई दिनेश वाघ यांच्याबाबत सोशल मीडियावर आक्षेपार्ह आणि अपमानास्पद भाषा वापरल्याचे काही संदेश व्हायरल झाल्याचा दावा बिरसा फायटर्स संघटनेने केला आहे. या प्रकारामुळे संबंधित कर्मचाऱ्याच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचल्याचे सांगत ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करून संबंधित ग्रामसेविकेवर तात्काळ प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. तसेच प्रशासनाने वेळेत योग्य निर्णय घेतला नाही, तर ग्रामस्थांना सोबत घेऊन व्यापक जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. याचबरोबर ग्रामपंचायत कर्मचारी दिनेश वाघ यांना न्याय मिळवून देण्यासाठी कर्मचारी संघटना पुढे येणार का, असा प्रश्नही स्थानिक स्तरावर उपस्थित केला जात आहे. या प्रकरणामुळे ग्रामपंचायत प्रशासन, कर्मचारी आणि ग्रामस्थांमध्ये चर्चेला उधाण आले आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306